**इतिवृत्त (Minutes of Meeting)**

**समितीचे नाव:** नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समिती, नाशिक
**सभेचा प्रकार:** प्रथम स्थायी समिती सभा
**दिनांक:** २१/०७/२०२६
**वेळ:** सकाळी १०:०० वाजता
**स्थळ:** लोकनेते गोपीनाथजी मुंडे अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक
**सभेचे अध्यक्ष:** डॉ. कैलास चंद्रात्रे (अध्यक्ष, क्रीडा समिती व प्राचार्य, ल.गो.मुं. अभियांत्रिकी महाविद्यालय)

---

**उपस्थिती:**

सभेस नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, सदस्य आणि विविध महाविद्यालयांचे क्रीडा संचालक उपस्थित होते. (उपस्थितीची स्वाक्षरी नोंद स्वतंत्र जोडली आहे.) सभेसाठी एकूण १३ सदस्य उपशीत होते

**अनुपस्थिती :-** जेष्ठ क्रीडा संचालक डॉ. सुनील मोरे हे काही कारणास्तव उपस्थित राहू शकत नसल्यामुळे तसे कळविण्यात आले होते आणि आजच्या सभेसाठी त्यांची रजा मंजूर करण्यात आली

**सभेचे कामकाज आणि ठराव:**

**स्वागत व अभिनंदन**

सर्वप्रथम सर्व नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत लोकनेते गोपीनाथजी मुंडे अभियांत्रिकी महाविद्यालया मार्फत करण्यात आले आणि समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष आणि सचिव यांचा सत्कार स्थायी समिती मार्फत करण्यात आला

अध्यक्षांच्या परवानगीने सभेत पुढील विषय चर्चेसाठी घेण्यात आले.

**विषय क्र. १: सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या तेरीज पत्रकाबद्दल चर्चा करणे.**

- **चर्चा:** मागील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या शेवटच्या सर्वसाधारण सभेत ठरल्या प्रमाणे सचिव उपसचिव यांची प्रवास बील आणि स्थायी समितीचे मानधन यांची बिले तपासणी साठी विभागाने पत्र दिले होते. त्या नुसार दिनांक ८/०७/२०२६ रोजी सकाळी १० ते १ या वेळेत लोकनेते गोपीनाथजी मुंडे अभियांत्रिकी महाविद्यालयात सदर बिले हि तपासणी साठी ठेवण्यात आली. प्रा. स्वप्नील कर्पे आणि डॉ. सुहास वराडे यांनी सदर हिशोब तपासला उपस्थित लावली होती असे माजी सचिव डॉ. नरेंद्र निकम यांनी स्थायी समिती समोर सांगितले. तरी देखील सदर हिशोब अंतिम तपासणी करता समिती समोर ठेवण्यात आला.
- **ठराव क्र. १:** सन २०२५-२६ चे तेरीज पत्रक योग्य व अचूक असल्याचे ठरवून ते सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

- **सूचक:** प्रा.रोशनी गुजराथी
- **अनुमोदक:** डॉ.राजाराम कारे

**विषय क्र. २: सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाच्या अंदाज पत्रकाबाबत (Budget) चर्चा करणे.**

- **चर्चा:** आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये क्रीडा स्पर्धा, कार्यालयीन खर्च आणि इतर उपक्रमांसाठी लागणाऱ्या अंदाजित खर्चाचे बजेट सादर करण्यात आले. खेळाडूंच्या सोयी-सुविधांवर अधिक भर देण्याबाबत चर्चा झाली. तसेच बस प्रवास दरात झालेल्या वाढीचा विचार करता संघ व्यवस्थापक आणि सचिव, उपसचिव यांना देण्यात येणाऱ्या प्रवास खर्चाच्या रक्कमेत वाढ करण्याचे सुचविण्यात आले. तसेच वेबसाईट योग्य पद्धतीने चालावी आणि ती अद्यावत राहावी या साठी बजेट मध्ये वाढ करावी या बद्दल चर्चा झाली.
- **ठराव क्र. २:** आगामी आर्थिक वर्षाचे सादर केलेले अंदाजपत्रक (Budget) काही आवश्यक सुधारणांसह सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

- **सूचक: डॉ.दिनेश उकिर्डे**
- **अनुमोदक: डॉ.प्रदिप वाघमारे**

**विषय क्र. ३: नाशिक विभागामार्फत देण्यात येणाऱ्या गणवेशाच्या (Uniform) डिझाईनबाबत चर्चा करणे.**

- **चर्चा:** नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंसाठी उत्कृष्ट दर्जाचा आणि आकर्षक डिझाईन असलेला गणवेश (क्रीडा किट) असावा, अशी मागणी सदस्यांनी केली. यासाठी काही डिझाईन्सचे नमुने दाखवण्यात आले.
- **ठराव क्र. ३:** खेळाडूंच्या सोयीसाठी कापडाचा दर्जा उत्तम व दर्जेदार कापड ठरवून डिजाईन फायनल करून मंजुरी देण्यात आली.

- **सूचक: डॉ.मनीष देवरे**
- **अनुमोदक: डॉ.दिपक सौदागर**

**विषय क्र. ४: आंतर महाविद्यालयीन स्पर्धांच्या वेळापत्रकाबद्दल (Tournament Schedule) चर्चा करणे.**

- **चर्चा:** चालू वर्षातील विविध खेळांच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन कोणत्या महाविद्यालयात करावे आणि त्याचे वेळापत्रक कसे असावे, यावर सविस्तर चर्चा झाली. पावसाळा आणि शैक्षणिक परीक्षांचा तसेच इंजिनीरिंग , BBA , BCA यांची प्रवेश प्रक्रिया अद्याप सुरु झालेली नाही सदर प्रवेश प्रक्रिया यांचा विचार करून नियोजन करण्याचे ठरले.
- **ठराव क्र. ४:** सर्व खेळांचे तात्पुरते वेळापत्रक निश्चित करण्यात यावे, अंतिम वेळापत्रक लवकरच सर्व महाविद्यालयांना पाठवण्याचे ठरले.

- **सूचक: डॉ.राजाराम कारे**
- **अनुमोदक: डॉ.सुदर्शन नागरे**

**विषय क्र. ५: प्रो रेटा (Pro-rata fees) बद्दल चर्चा करणे.**

- **चर्चा:** विद्यापीठाच्या नियमानुसार प्रति विद्यार्थी गोळा केल्या जाणाऱ्या प्रो रेटा निधीच्या वसुलीबाबत आणि विविध महाविद्यालयांकडील थकीत रकमेचा आढावा घेण्यात आला.
- **ठराव क्र. ५:** प्रो.रेटा जमा करणे हे काम फक्त सचिव किवा सह सचिवाचे नसून सर्वांचे आहे आपल्या महाविद्यालायचा प्रो-रेटा भरून घेण्याची जबाबदारी त्या शारीरिक शिक्षण संचालकाची देखील आहे असे सर्वानुमते मान्य करण्यात आले. सर्व संबंधित महाविद्यालयांनी वेळेत प्रो रेटा निधी जमा करावा, यासाठी कडक सूचना देण्याचे आणि नियमांनुसार निधीचे योग्य वाटप करण्याचे सर्वानुमते ठरले.

- **सूचक: डॉ.दिनेश उकिर्डे**
- **अनुमोदक: डॉ.नरेंद्र निकम**

**विषय क्र. ६: टोकन ग्रांटबद्दल (Token Grant) चर्चा करणे.**

- **चर्चा:** विद्यापीठाच्या मार्गदर्शन तत्वानुसार आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी देण्यात येणाऱ्या टोकन ग्रांट वर बजेट च्या part A वजा केल्यावर राहिलेल्या रकमेच्या 55% खर्च अपेक्षित आहे. त्या नुसार स्पर्धांचे यशस्वी आयोजन करणाऱ्या यजमान महाविद्यालयांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीबाबत (Token Grant) चर्चा झाली. महागाई लक्षात घेता ही ग्रांट वाढवून मिळावी, असा सूर उमटला.
- **ठराव क्र. ६:** यजमान महाविद्यालयांना स्पर्धा आयोजनासाठी आवश्यक ती टोकन ग्रांट वेळेवर आणि काही विशिष्ठ खेळ वगळता सुधारित २० % वाढ दराने मंजूर करण्याचे ठरले.

- **सूचक: डॉ.दिपक सौदागर**
- **अनुमोदक: प्रा. स्वप्नील कर्पे**

**ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे:**

**विषय क्र. ७ : आंतर महाविद्यालयीन स्पर्धासाठी SOP तयार करणे**

- **चर्चा:** आंतर महाविद्यालयीन स्पर्धेदरम्यान रिपोर्टिंगची वेळा शारीरिक शिक्षण संचालकांची अनुपस्थिती किवा ठरवून दिलेल्या वेळेत संघ उपस्थिती आणि फॉर्म भरताना झालेल्या चुका यांचा विचार करता आंतर महाविद्यालयीन स्पर्धासाठी विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार नाशिक विभागाची SOP तयार करण्याचे ठरविण्यात आले.
- **ठराव क्र.७:** आंतर महाविद्यालयीन स्पर्धासाठी नाशिक विभागाची SOP तयार करण्याचे ठरविण्यात आले.

- **सूचक: डॉ.दिपक सौदागर**
- **अनुमोदक: डॉ.सुदर्शन नागरे**

**विषय क्र. ८ : ज्या महाविद्यालयांनी प्रो रेटा (Pro-rata fees) दिलेला नाही त्यांना कोणताही इवेन्ट देऊ नये .**

- **चर्चा:** सभेमध्ये उपस्थित सदस्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, अनेक महाविद्यालयांनी अद्याप त्यांचे 'प्रो रेटा शुल्क' (Pro-rata fees) जमा केलेले नाही. हे शुल्क वेळेवर जमा न झाल्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत. आर्थिक शिस्त आणि नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक असल्याचे सर्व सदस्यांनी मान्य केले.
- **ठराव क्र.८ :** या विषयावर सखोल चर्चा करून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला:
  १. ज्या महाविद्यालयांनी प्रो रेटा शुल्क जमा केलेले नाही, त्यांची **तात्काळ अंतिम यादी** तयार करण्यात यावी.
  २. अशा थकीत शुल्क असणाऱ्या महाविद्यालयांना विद्यापीठाचा **कोणताही इव्हेंट (क्रीडा स्पर्धा) आयोजित करण्याची किवा स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही.**

- **सूचक: डॉ.सुदर्शन नागरे**
- **अनुमोदक: डॉ.दिपक सौदागर**

**विषय क्र. ९ :** रुपी बँकेतील खात्याबाबत चर्चा करणे

- **चर्चा:** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या शेवटच्या सभेत ठरल्या प्रमाणे कमिटीला पत्र आणि मेसेज किंवा फोन करून पुढील कार्यवाही बद्दल चर्चा करावी.
- **ठराव क्र.९ :** कमिटीला पत्र ,मेसेज किंवा फोन करून पुढील कार्यवाही बद्दल चर्चा करण्याचे ठरले.

- **सूचक: प्रा.चेतन आव्हाड**
- **अनुमोदक: डॉ.नरेंद्र निकम**

प्रा.आव्हाड चेतन
सचिव
नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समिती, नाशिक

डॉ. कैलास चंद्रात्रे
अध्यक्ष
नाशिक जिल्हा विभागीय क्रीडा समिती, नाशिक